संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्रमांक ४७४/२०२५
सरकार वि. विशाल
<u>**नि. क्र. ७ लगत**</u>

अभियोग पक्षातर्फे **सा. क्र. १**

मी शपथेवर कथन करतो की,

**माझे नाव – शेख कादर शेख खाजामिया**

**वय – ३६ वर्ष, धंदा – मजुरी,**

**राहणार– पठाण गल्ली, पालम, ता. पालम, जि. परभणी.**

**<u>सहाय्यक सरकारी वकील श्री. एस. एन. डावकरे यांच्यातर्फे सरतपास सुरू.</u>**

१. मी आरोपीला ओळखत नाही. दिनांक ०५/०७/२०२५ रोजी मला पोलीसांनी जप्ती पंचनाम्याकरीता कुठेही बोलावले नव्हते. माझ्यासमक्ष पोलीसांनी काहीही जप्त केलेले नाही. सदर गुन्ह्यातील पंचनाम्याविषयी मला काहीही माहिती नाही. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने मला काही सांगावयाचे नाही. पोलीसांनी माझी एका कागदावर सही घेतली होती. मला माझी सही दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता मला जप्ती पंचनाम्यावरील माझी सही दाखवण्यात आली. जप्ती पंचनाम्यावर अ.न. १ ला सही आहे. ती माझीच आहे. त्या सहीस **नि.१३** देण्यात येते. जप्ती पंचनाम्यातील मजकुरा विषयी मला माहिती नाही.

**<u>(सरकारी वकीलांनी सदरचा साक्षीदार हा अभियोग पक्षास सहाय्य करत नसलेने त्यास सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. सरकारी वकीलांनी केलेल्या विनंतीनुसार सदर साक्षीदार सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी आणि साक्षीदारची विधाने खंडण करणेची अनुमती दिली.)</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०५/०७/२०२५ रोजी मला पोलीसांनी जप्ती पंचनामा करण्यासाठी पालम ते गंगाखेड रोडवरील विशाल लंच होमसमोर बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष पोलीसांनी देशी दारू भिंगरी संत्राच्या प्रत्येकी १८० मि. ली. मापाच्या १२ बाटल्या जप्त केल्या. हे म्हणणे खरे नाही की, तपासणीकरीता त्यातील एक बाटलीवर माझी, दुसऱ्या पंचाची व पोलीसांच्या सह्या घेऊन सिलबंद केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझ्यासोबत दुसरा पंच गंगाधर शिंदे हा होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष पोलीसांनी आरोपीच्या ताब्यातुन दारू जप्त करून त्याचा पंचनामा करून त्यावर मी सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचवण्याकरीता खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास पुर्ण</u>**

संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्रमांक ४७४/२०२५
सरकार वि. विशाल
**नि. क्र. ७ लगत**

**आरोपीतर्फे वकील श्री. एस. आर. रोकडे यांनी उलटतपास नाकारला.**

दिनांक ०४/०७/२०२६

सा.वा.दा.ब.अ.क.केले.

समक्ष,

MANISHA MAHADEO PATIL
Digitally signed by MANISHA MAHADEO PATIL
Date: 2026.07.04 16:43:27 +0530

(मनिषा म. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पालम.

श्रवणोत्तर स्विकृत,

MANISHA MAHADEO PATIL
Digitally signed by MANISHA MAHADEO PATIL
Date: 2026.07.04 16:43:31 +0530

(मनिषा म. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पालम.